# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 April 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०७ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०

****

- केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी विशेष निरीक्षकांची नियुक्ती
- वीस दिवसांमध्ये निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रचारासंबंधी विविध परवानग्या काढण्यासाठी ७३ हजाराहुन अधिक अर्ज दाखल
- डॉक्टर अविनाश येळीकर यांच्या १ लाख शस्त्रक्रियांची नोंद आढळल्यास पद्मश्रीसाठी प्रयत्न करणार असल्याचं केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांची ग्वाही

आणि

- आयपीएलच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचं दिल्ली कॅपिटल्ससमोर २३५ धावांचे आव्हान

****

केंद्रीय निवडणूक आयोगानं, महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी सामान्य आणि पोलीस अशा दोन श्रेणींमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात सेवानिवृत्त सनदी अधिकारी धर्मेंद्र एस गंगवार यांची सामान्य विशेष निरीक्षक आणि भारतीय पोलिस सेवेतले माजी अधिकारी एनके मिश्रा यांची पोलिस विशेष निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्याचं, आयोगानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. हे विशेष निरीक्षक, कर्मचारी, सुरक्षा दलं आणि मतदान यंत्रांवर देखरेख ठेवतील. ते स्वत: राज्य मुख्यालयात थांबतील आणि आवश्यकता भासली तर संवेदनशील आणि जिथे समन्वयाची गरज आहे अशा भागांना भेट देतील, असं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

****

निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणूकीच्या प्रचारासंबंधित परवानगी देण्यासाठी सुविधा संकेतस्थळ सुरु केलं आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातुन प्रचार सभा आयोजित करणं, तात्पुरतं पक्ष कार्यालय उघडण, घरो-घरी जाऊन प्रचार, हेलीकॉप्टर, वाहन वापर परवाना आणि प्रचार सामग्री वितरण करण्याची परवानगी देण्यात येत आहे. या संकेतस्थावर सुरुवातीच्या २० दिवसांमध्ये तब्बल ७३ हजाराहुन अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यातील ४४ हजारांहून अधिक अर्ज मंजूर तर ११ हजार २०० अर्ज नामंजूर केले आहेत. तर १० हजारहुन अधिक अर्ज रद्द केले असून, काही अर्ज प्रक्रीयाधीन आहेत. सर्वाधिक २३ हजार अर्ज तामिळनाडू, १२ हजार पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेशातुन १० हजार अर्ज प्राप्त झाले आहेत.

****

देशाच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महाराष्ट्रातली पहिली प्रचारसभा उद्या चंद्रपुरात भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यासाठी होणार आहे. मोरवा विमानतळाजवळच्या १६ एकराच्या विस्तीर्ण परिसरात ही सभा होणार असून नरेंद्र मोदी सुमारे १० वर्षांनी चंद्रपूरमधे सभा घेणार आहेत. या सभेच्या दृष्टीनं भाजपातर्फे जय्यत तयारी होत असून सुरक्षा व्यवस्थाही ठेवण्यात आली आहे.

****

वंचित बहुजन आघाडी पक्षानं बीड लोकसभा निवडणुकीसाठी अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तसंच नागपूर जिल्ह्यातील रामटेक लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांना पाठिंबा दिल्याची माहिती पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकुर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

****

आंतराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त जनजागृती म्हणून नाशिक इथं आज गोदावरी नदीच्या काठावर ५ हजार सहाशे २५ चोरस फुटांची रांगोळी काढण्यात आली आहे. या रांगोळीच्या माध्यमातून भरडधान्याचं महत्त्व सांगतानाच त्यातील विविधता, पर्यावरणपूरकता आरोग्यासाठी उपयुक्त, सशक्त आणि सकस आहार

समृद्धीचे भांडार हा संदेश देण्यात आला. तब्बल शंभर महिलांनी चार तासांत ही महारांगोळी साकारल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडेसात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

दिवंगत डॉक्टर अविनाश येळीकर यांनी केलेल्या एक लाख प्लास्टिक शस्त्रक्रियांची नोंद मिळाल्यास त्यांना पद्मश्री पुरस्कार देण्यासाठी आपण प्रयत्न करु, अशी ग्वाही केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी दिली आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या महात्मा गांधी मिशन इथं आज मराठवाड्यातले पहिले प्लास्टिक सर्जन दिवंगत डॉक्टर अविनाश येळीकर यांच्या पहिला स्मृतिदिनानिमित्त डॉक्टर अविनाश येळीकर- सर्जन गरीबांचा, मैत्र जीवांचा या त्यांच्यावरच्या गौरव ग्रंथांचं प्रकाशन झालं, त्यावेळी कराड बोलत होते. दरम्यान, सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉक्टर रवीन थत्ते यांच्या हस्ते या गौरवग्रंथाचं प्रकाशन करण्यात आलं. या कार्यक्रमाला एमजीएम संस्थेचे अंकुशराव कदम, गौरव ग्रंथाचे संपादक डॉक्टर सुधीर गव्हाणे आदींची उपस्थिती होती.

****

निवडणूक कामकाजात सजगता महत्त्वाची असून, हे काम करतांना नेहमी सकारात्मकता आवश्यक आहे, असं प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी म्हटलं आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं मतदारसंघातल्या निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आजच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते. लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने औरंगाबाद पश्चिम, सिल्लोड, कन्नड, गंगापूर आणि वैजापूर विधानसभा मतदारसंघ निहाय प्रशिक्षण सत्राचा आजचा दुसरा दिवस आहे. ज्या लोकशाहीमुळे आज आपणा सर्वांना पद, मान, सन्मान, चरितार्थाचं साधन, अशा सर्व गोष्टी मिळत आहेत, त्या लोकशाहीची सेवा करण्याची संधी या निवडणूक

कामकाजाच्या निमित्ताने आपल्याला मिळाली आहे, असंही स्वामी यांनी म्हटलं आहे. दरम्यान, औरंगाबाद पूर्व मतदारसंघात आज सकाळी २५० हून अधिक सायकलस्वारांनी मतदार जनजागृतीसाठी सायकल फेरी काढण्यात आली.

****

लातूर लोकसभा मतदारसंघासाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, तसच मतदान शांततेत पार पडावं, यासाठी जिल्ह्यात ७ मे रोजी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत. या दिवशीचे आठवडी बाजार इतर दिवशी भरवण्यात येण्यात यावेत, असंही याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्य सरकारच्या दूध अनुदान योजनेंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातल्या ६७ हजार दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात शासनाने ६१ कोटी रुपये अनुदान जमा केले. राज्य सरकारच्या वतीनं दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ५ रुपये अनुदानाची योजना सुरु केली होती. मात्र, काही तांत्रिक कारणांनी हे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले नव्हते. दूग्ध व्यवसाय आणि पशुसंवर्धन विभागाच्या वतीनं अनुदानासाठी लावण्यात आलेल्या अटी आणि नियमांमध्ये आता शिथीलता केल्यामुळे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होण्यास मदत झाली.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव तालुक्यातल्या बेंद्री इथं काल पतीच्या अपघाती अपघाती निधनानंतर पत्नीनेही गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. अरुण बाबुराव केंद्रेकर हे विष्णुपुरी इथून आपल्या कर्तव्यावरून परत येत असतांना त्यांचा एका अपघातात मृत्यू झाला, ही माहिती त्यांच्या कुटूंबीयांना कळवल्यानंतर पत्नी स्नेहा केंद्रे यांनी घरामध्ये गळफास घेतल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेड शहरात आज सकाळी जिल्हा पोलीस दलातर्फे सद्भावना रॅली काढण्यात आली. सध्याच्या विविध सण-उत्सवाच्या अनुषंगानं याचं आयोजन करण्यात आलं. यात जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महापालिका आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे,

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांसह शहरातील ठाणे अधिकारी, विविध धर्मांचे धर्मगुरू, एकात्मतेचं दर्शन घडवणारी वेशभूषा केलेल्या शालेय विद्यार्थ्यांचीही यात मोठ्या संख्येन उपस्थिती होती.

****

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्राध्यापक होण्यासाठीची राज्य पात्रता चाचणी अर्थात सेट परीक्षा छत्रपती संभाजीनगरातील २२ केंद्रांवर आज घेण्यात आली. या परीक्षेला ८ हजार १०५ विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबईच्या वानखेडे मैदानावर आज पहिल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सच्या संघानं प्रथम फलंदाजी करताना रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी डावाची सुरुवात केली. रोहित शर्मा ४९, इशान किशन ४२ धावा काढून बाद झाले. त्यानंतर संघाचा कर्णधार हार्दिक पांड्यानं ३९ धावांची खेळी केली. टीम डेव्हीड ४५ धावा काढत नाबाद राहिला. रोमारिओ शेफर्ड यानं १० चेंडूत चार षटकार आणि तीन चौकारांसह नाबाद ३९ धावा फटकावल्या. मुंबई इंडियन्स संघानं २० षटकात ५ गडी बाद २३४ धावा काढल्या. दिल्ली कॅपिटल्सच्या संघानं २३५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा आठ षटकात एक बाद ६९ धावा केल्या होत्या.

दरम्यान, आजच्या दिवसातील दुसरा सामना लखनऊच्या एकाना स्पोर्ट सिटी मैदानावार लखनऊ सुपर जायंटस आणि गुजरात टायटन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात खेळला जाईल.

****

ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय पुरुष हॉकी संघाचा दुसरा सामना आज दुपारी पर्थ इथं झाला. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा ४-२ असा पराभव करत ५ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

****